# पक्षाध्यक्षांकडे पालकत्व असलेल्या बीड जिल्ह्यात पक्षच शिलेदारांविना पोरका ?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## माजलगाव धारूर व वडवणी या तीन तालुकाध्यक्षांच्या निवडी झाल्या पण उर्वरित पाच मतदारसंघातील आठ तालुका अध्यक्षांच्या निवडीला मुहूर्त लागेना ?

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २५६ ■ बुधवार दि.४ जून २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 256 ■ Wednesday Dt.4 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# अजितदादा पालकमंत्री असणाऱ्या जिल्ह्यातच पक्षाच्या नियुक्त्या रखडल्या? एक जिल्हाध्यक्ष अन तीन तालुकाध्यक्षांवर पक्षाची धुरा!

## जिल्ह्याची घसरलेली गाडी रुळावर आणण्याचा प्रयत्न करणारे अजित दादा आता पक्षाची संघटनात्मक गाडी रुळावर आणण्यासाठी कधी आणि काय भूमिका घेणार?

### ■ पालकमंत्री अजित दादा आणि आ. धनंजय मुंडे यांच्या अडचणीच्या काळात सोबत राहणारा जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण यांच्याकडे पाहिले जाते!

बीड । प्रतिनिधी

खुद्द पक्षप्रमुख अजित दादा पवार हे बीड जिल्ह्याचे पालकत्व सांभाळत आहेत. पक्षाचा वर्धापन दिन तोंडावर आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही जवळ आलेल्या असल्याने सदस्य नोंदणीसह संघटनवाढीसाठी प्रयत्न सुरु आहेत. पण, जिल्ह्यात पक्ष शिलेदारांविना पोरका आहे. एक जिल्हाध्यक्ष आणि तीन तालुकाध्यक्षांवर राष्ट्रवादी काँग्रेसचा संघटनात्मक कारभार सुरु आहे. आठ तालुकाध्यक्षांसह युवक, सामाजिक न्याय, महिला, युवती, ओबीसी अशा पक्षाच्या विविध आघाड्यांना सहा महिन्यांपासून कार्यकारीण्यांच नाहीत.

राज्यासह देशाला हादरवून सोडलेल्या सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण व हत्या प्रकरणाने राजकारण चांगलेच तापलं होतं. या प्रकरणात धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराड आणि विष्णू चाटे हा राष्ट्रवादी काँग्रेसचा पदाधिकारी असल्याचे स्पष्ट होताच मोठा वाद निर्माण झाला होता.तर धनंजय मुंडे यांना आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. त्यानंतर येथे पक्षाच्या नियुक्त्या अद्याप झालेल्या नाहीत. यावरून पक्षाध्यक्षांकडे पालकत्व असलेल्या बीड जिल्ह्यात पक्षच शिलेदारांविना पोरका असल्याचे आता बोलले जात आहे. येथे सध्या एक जिल्हाध्यक्ष आणि तीन तालुकाध्यक्षांवर पक्षांची धूरा आहे. तर आठ तालुकाध्यक्षांसह युवक, सामाजिक न्याय, महिला, युवती, ओबीसी अशा पक्षाच्या विविध आघाड्यांना सहा महिन्यांपासून कार्यकारी अद्याप निवडण्यात आलेली नाही.

सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण व हत्या प्रकरणात पक्षातील पदाधिकाऱ्यांचा

▶ पान २ वर







> पक्षप्रमुख अजित पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे तसेच जिल्ह्यातील पक्षाच्या नेत्यांशी चर्चा करुन लवकरच उर्वरित तालुकाध्यक्ष आणि पक्षाच्या सर्व कार्यकारीण्या जाहीर करण्यात येतील. जिल्ह्यात पक्षाला मानणारा मोठा वर्ग आहे हे मागच्या निवडणुकीत सिद्ध झाले आहे.
>
> – **ॲड. राजेश्वर चव्हाण,**
> जिल्हाध्यक्ष,
> राष्ट्रवादी काँग्रेस, बीड

## देवळा येथे २२२ महामार्ग रस्त्याचे काम नकाशा प्रमाणे न करता खाजगी जागेतुन करण्याचा डाव

### उपविभागीय अभियंता चद्रकांत बोराडे यांचे दुर्लक्ष

वडवणी । प्रतिनिधी



वडवणी तालुक्यातील देवळा येथे २२२ महामार्गा रस्त्याचे काम करण्यात येत असुन ते काम शासनाच्या नकाशा प्रमाणे ज्या सर्वे मधून आहे तेथून न करता दुसर्यात सर्वेतुन खाजगी जागेतुन केला जात आहे. हे काम शासणाच्या नकाशा प्रमाणे करावे अशी मागणी गावातील नागरिक करत आहेत.

तालुक्यातील देवळा येथे चालू असलेले काम राज्य महामार्ग २२२ सार्वजनिक बांधकाम विभाग वडवणी अंतर्गत केले जात असुन उपविभागीय अभियंता चद्रकांत बोराडे सार्वजनिक बांधकाम विभाग बीड यांचे या कामावर दुर्लक्ष होतांना दिसत आहे गावाचा नकाशा पाहुन ईतर सर्वे नंबर मध्ये काम असतांना दुसर्याच सर्वे नंबर मध्ये रस्ता करत आहेत. ज्या सर्वे मध्ये काम आहे त्याच सर्वे नंबर मध्ये नियमाप्रमाणे काम करण्यात यावे अशी मागणी देवळा येथील ग्रामस्थ करत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे हे चालू असलेले राज्य महामार्ग २२२ कामावर दुर्लक्ष होत आहे काही विचारणा केली असता उपस्थीत अधिकार्यांने तेथून पळ काढला.

## बीड शहरात गुंडगिरी करणाऱ्या धोकादायक गुंडाची एमपीडीए कायद्याअंतर्गत हर्सुल कारागृहात रवानगी!

### जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा गुंडगिरी करणाऱ्याला मोठा दणका

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शनीचे प्रयत्न चालकले आहेत त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉनसन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे वातु माफीयांचे समुजण्या करण्याचा उदरात दुष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून MPDA अंतरावर आहे. त्या अनुषधांने पोनि पो.स्टे. पेठ बीड यांनी दिनांक १३.०५.२०२५ रोजी इसन नामे रोख नवीद शेख चाँद वय २७ वर्षे रा. जामा मजीद जवळ, मोमीनपुरा बीड ता. जि.बीड याचे विरुद्ध MPDA कायद्याअंतर्गस्थन करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बोड यांच्या मार्फतीने मा पिंडाधिकारी साहेव बीड यांना सादर केला होता सदर स्थानबाट इसमावि पो.डा. पेठ बीड येथे पराविषयी करणे विनयभंग करणे ओळखीचा फायदा घेऊन लुटणे, गैरकायदयाची मंडली जमविणे, दंगा करणे, गंभीर दुखापत करणे, रस्ता आढविणे, पुरावा नह करणे, अवैध शस बाळगणे, जमाबंदी आदेशाचे उल्लंघनकरणे, बाल लैंगिक अत्याचार करणे, फौजदारी कट रचने, अजीवकामाच्या शिक्षेस पात्र असलेले अपराध करणे, जादुटोण प्रतिबंधक कायदयाचे उत्तपन करणे, उकवणुक करणेवटी करण करणणे या व अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ०७ गुाची नोंद पोलीस

▶ पान २ वर



## मठ संस्थाच्या गैरव्यवहाराची चौकशीसाठी सासुरा ग्रामस्थांचे उपोषण

बीड । प्रतिनिधी

२ जानेवारी २०२४ रोजी सासुरा ते पंढरपूर पायी दिंडी जात असताना जमा झालेल्या देणगी संदर्भात कोणती माहिती सार्वजनिक करण्यात आलेली नव्हती. तसेच देणगी देणाऱ्यांना पावती बुक प्रिंट केलेले सही परत पावती दिली जाईल असे सांगितले, मात्र प्रत्यक्षात पावती देण्यास टाळाटाळ करण्यात आली. सदरील मालमत्ते संदर्भातील माहिती जाणीवपूर्वक कार्यालयापासून लपवून ठेवली.

मठाधिपती यांनी आळंदी येथील संस्थानाची किमान सहा ते सात कोटी रुपयांची मालमत्ता ज्याच्या नावावर केली. त्याचा मोठा भाऊ संस्थानाचा सचिव आहे. आणि दुसरा गाडीवर चालक म्हणून कामास आहे.

त्यांच्या उत्पन्नाचा मार्ग आणि मिळवलेली संपत्ती याचे पडताळणी शासनाने करावी, तसेच भाविकांच्या भावनांशी खेळणाऱ्या मठाधिपती आणि विश्वस्त मंडळावर कार्यालयामार्फत तात्काळ योग्य ती कारवाई करण्यात यावी, एकनाथ महाराज मठ संस्थान सासुरा या ट्रस्ट चे अध्यक्ष रतन महाराज मुंडे आणि संस्था सचिव सुशेन रामराव भोसले करत असलेल्या गैरव्यवहारांची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सासुरा ता. केज येथील ग्रामस्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसले आहेत.



# बिंदुसरा धरणावर पर्यटकांची हुल्लडबाजी सुरूच

## प्रशासनाच्या सावधानता अन सुरक्षिततेच्या आवाहनाकडे दुर्लक्ष; सुरक्षारक्षक नेमण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड शहराजवळील पाली येथील बिंदुसरा मध्यम प्रकल्प १०० टक्के पुर्णतः भरलेले असुन धरणाच्या सांडव्यावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहु लागले आहे. या दृश्याचा अनुभव घेण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने धरण परिसरात गर्दी करत आहेत.

मात्र सध्याची परिस्थिती अत्यंत धोकादायक असुन नागरीकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण विभागाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन करून सुद्धा पर्यटकांना याचे गांभीर्य नसुन त्याकडे दुर्लक्ष करत धरणाच्या भिंतीवर, सांडव्यावर, पायथ्याशी पर्यटक जमा होत असून पर्यटकांच्या हुल्लडबाजी व हलगर्जीपणामुळे अपघात घडुन जिवितहानी होऊ नये यासाठी प्रतिबंधकात्मक उपाययोजना म्हणून सुरक्षारक्षक तैनात करण्यात यावेत तसेच संभाव्य दुर्घटना घडल्यास संबधित विभागाच्या जबाबदार आधिकाऱ्यांवर प्रशासकीय करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड, उपविभागीय अधिकारी बीड, तहसीलदार बीड, पोलिस निरीक्षक ग्रामीण पोलीस स्टेशन यांना केली आहे.



**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नागरीकांना सावधानता व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून केलेले आवाहन**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी केले आहे. जिल्हा प्रशासनाने सुचना करताना पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असुन अचानक पाण्याची पातळी वाढू शकते. त्यामुळे धरण परिसरात जाणे टाळावे, धरणाच्या काठावर उभे राहून फोटो किंवा सेल्फी घेणे अत्यंत धोकादायक असुन अपघाताची शक्यता असल्याने टाळावे तसेच पालकांनी मुलांना धरण परिसरात जाण्यापासून रोखावे आणि त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवावे आणि स्थानिक प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने केले आहे. मात्र याकडे पर्यटक दुर्लक्ष करताना दिसुन येत आहे.

**२०२१ मध्ये बिंदुसरा प्रकल्पाच्या सांडव्यातील पाण्याच्या डोहात बुडून २ युवकांचा दुर्दैवी मृत्यू**

दररोजच्या पावसाने पाणी पातळीत वाढ होत असून धोक्यात जीव घालुन पर्यटक लोखंडी पुलावरून धरणांच्या धरणाच्या भिंतीवर व पायथ्याशी पर्यटक सांडव्याच्या ठीकाणी जमा होत असुन सांडव्याच्या भिंतीवर चढतात फोटो काढतात त्यानिमित्ताने पाय घसरून अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. पाठीमागे दि.१९ ऑक्टोबर २०२१ रोजी याच बिंदुसरा प्रकल्पाच्या सांडव्यातील पाण्याच्या डोहात बुडुन ओंकार लक्ष्मण काळे वय १६ वर्षे आणि शिव संतोष पिंगळे वय १६ वर्षे रा.शिंदेनगर, कॅनाल रोड बीड यांचा मृत्यु झाला होता.

**सावधान प्रतिबंधक क्षेत्र असा बोर्ड लाऊन पाटबंधारे विभागाने जबाबदारी झटकली ; प्रकल्पावरील सुरक्षारक्षक नेमकं काय करतात??**

बिंदुसरा धरणाच्या सांडव्याशेजारी धुळे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील कडेला सावधान प्रतिबंधक क्षेत्र असा फलक लावण्यात आला असून अपघात, दुर्घटना अथवा जिवितहानी झाल्यास जलसंपदा विभाग जबाबदार नाही, कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड आदेशावरून असा फलक लावण्यात आला असून या तलावाच्या ठिकाणी कुठल्याही प्रकारची संरक्षण व्यवस्था नसल्यामुळेच त्याठीकाणी अपघाताच्या घटना घडत असुन पाटबंधारे विभागाचे अधिकारी जबाबदारी झटकतात मात्र प्रकल्पाच्या सुरक्षिततेसाठी नेमलेले सुरक्षारक्षक नेमकं काय काम करतात असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे सुरक्षा रक्षक नेमण्यात यावेत. भविष्यात दुर्घटना घडल्यास संबधित जबाबदार आधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.



# आई–वडिलांची सेवा हीच ईश्वर सेवा : कल्याण महाराज शिंदे

आष्टी । प्रतिनिधी

आपले जीवन जगत असताना आपण कोणतीही वारी करण्यापेक्षा आई–वडिलांची सेवा केली तर त्यात नक्कीच घडते आई वडील हेच पंढरपूर आहे. त्यामुळे जिवंत असताना एवढी सेवा करावी, असे प्रतिपादन ह भ प कल्याण महाराज कल्याण महाराज शिंदे यांनी वैकुंठवासी महादेव खंडू शिंदे यांच्यापुण्यस्मरण निमित्त आयोजित केलेल्या कीर्तनात बोलत होते.

ते पुढे बोलताना म्हणाले की, आपण जिवंत असताना आई–वडिलांना जपत नाही जीव लावत नाही नंतर आपण वाऱ्या करतो पण त्या वाऱ्या विरता आहेत. त्यामुळे जिवंत असतानाच आई–वडिलांचे सेवा हे सर्वश्रेष्ठ सेवा आहे असे ते म्हणाले. यावेळी राजकीय सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते. महाप्रसादाचा कार्यक्रमाचा उपस्थित भाविकांनी लाभ घेतला.

# टाकरवन येथे अहिल्याबाई होळकर जयंती उत्साहात साजरी

टाकरवन । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथे राष्ट्रमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी रक्तदान शिबिर पार पडले. यावेळी १७ रक्तदात्यांनी रक्तदान केले तसेच विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धा आयोजित केली होती. यात विद्यार्थिनींनी मोठा सहभाग नोंदवत छत्रपती शिवाजी महाराज, महान क्रांतिकारक शहीद भगतसिंग, राजमाता मासाहेब जिजाऊ राष्ट्रमाता अहिल्याबाई होळकर यांची रांगोळीच्या माध्यमातून प्रतिमा काढण्यात आली.

महिला वरील वाढत्या अत्याचारावर प्रश्न उपस्थित करत. एका विद्यार्थिनीने मला वाचवायला अहिल्यादेवी पुन्हा जन्म घेतील का? असा संदेश रांगोळीच्या माध्यमातून दिला आहे. यावेळी पुनम बापूराव सुरवसे, काव्या परमेश्वर सुरवसे, श्रुती रामा बनगर, सपना गंगाधर सुरवसे, अभिलाषा बाळासाहेब ढोबळे, अक्षरा तुळशीराम सुरवसे या विद्यार्थ्यांनी रांगोळी स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता.




रक्तदान शिबिरासाठी जीवनदायी बर्ड बँक बीड चे डॉ. पवार, विशाल राठोड, अक्षय आमटे यांनी संकलनाचे काम केले. यावेळी जनार्धन आडागळे, गणेश सातपुते, अशोक भिसे, अशोक सुरवसे अशोक गाडे, विठ्ठल गरड, अंगद सातपुते, डॉ राम शिंदे, राम गायकवाड, दिलीप सोळुके, एकनाथ माने, संतोष सातपुते, गणेश सातपुते, अमृत खोमाड, रमेश काळे, गोविंद आरबे, अनिल कस्पटे या १७ रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ना. पंकजा मुंडेंना उमाताई समशेट्टे परिवाराची अनोखी भेट

## लोकनेत्याच्या स्मृतिदिनी दिली गोमाता; गोपीनाथ गड करणार गोमातेचा सांभाळ

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा अकरावा स्मृतिदिन आज विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा झाला. या निमित्ताने गोपीनाथ गडावर अनेक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. या अनुषंगानेच आज गोपीनाथ गडावर गोमातेची अनोखी भेट भाजपा शहराध्यक्षा उमाताई समशेट्टी यांनी राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना दिली. या गोमातेचा सांभाळ करण्याची जबाबदारी गोपीनाथ गडाने घेतली आहे.



दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्याशी प्रत्येक कार्यकर्ता व व्यक्तीपरत्वे भावना जोडलेल्या आहेत. गोपीनाथ गड हे समर्थक व मुंडे प्रेमींसाठी एक देवालयच बनलेले आहे. गोपीनाथ गडावर तीन शक्तीपिठांचे एकत्र मंदिरही आहे. याठिकाणी गोमाता असावी या भावनेपोटी समशेट्टी परिवाराने यांनी एक गोंडस गोमाता (कालवड) गोपीनाथगडाला भेट देण्याचा निर्णय घेतला. उमाताई समशेट्टी यांनी ही गोमाता ना.पंकजाताई मुंडे यांना सुपूर्द केली. यावेळी नितीन समशेट्टी, आश्विन मोगरकर, प्रितेश तोतला, अनिश अग्रवाल, राहूल घोबाळे आदी उपस्थित होते. आता या गोमातेचा गोपीनाथ गडावर सांभाळ केला जाणार आहे. गोपीनाथ गडाच्या पालक व राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे या अर्थाने गोमाता भेट ही अनोखी भेट ठरली आहे.



आज तलवाडा पोलीस स्टेशनचे नूतन सहायक पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर यांची भेट घेतली तसेच पोलीस स्टेशनंचा पदभार घेतल्या बद्दल पुस्पगुच्छ देऊन सत्कार केला यावेळी डी.पी.आयचे गेवराई तालुका युवक अध्यक्ष साईनाथ अडागळे, पत्रकार शाम अडागळे, संतोष हातागळे, सुरेश हातागळे उपस्थित होते.

# किशनराव गायकवाड यांची पत्रकार संघाच्या उमरी तालुका अध्यक्षपदी निवड

नांदेड । प्रतिनिधी

दैनिक लोकनेता चे उमरी तालुका प्रतिनिधी तथा पत्रकार किशनराव सटवाजी गायकवाड यांनी अल्पावधीतच पत्रकार क्षेत्रात काम करून लोकप्रिय झालेले आहेत. यांच्या उल्लेखनिय कार्याची दखल घेऊन लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्याच्या उमरी तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्ष पदी किशनराव गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे.



त्यांच्या कार्याचा थोडक्यात परिचय असा कि, किशनराव सटवाजी गायकवाड राहणार कुदळा ता. उमरी जि. नांदेड येथील रहिवासी असून त्यांचा जन्म एका शेतकरी मजुरदाराच्या कुटुंबात १ जुलै १९७३ रोजी झाला आहे. परंतु त्यांनी गरीबीला ठोकर मारून गरीबीतुन पुढे जाण्यासाठी लहान पणा पासूनच अन्याय, अत्याचाराच्या विरोधात संघर्ष करून १९८६ साली उमरी येथील यशवंत विद्यालयात इयत्ता सहाव्या वर्गात शिकत असता पासूनच अखिल भारतीय अण्णा भाऊ साठे संघर्ष समिती या सामाजिक संघटनेच्या चळवळीत सहभागी होऊन शाखा अध्यक्ष ते राष्ट्रीय अध्यक्ष पदा पर्यंत काम करून अज्ञान समाजाला जागृत करण्यासाठी प्रस्थापित सत्ताधारी पुढारी व प्रशासकीय अधिकारी यांच्या विरोधात आवाज उठवलेला आहेत.

प्राथमिक शाळेत असता पासुन अंगी लढाऊ पणा होता. लहानपणी विद्यार्थी मित्रांना संघटीत करून शाळेत कबड्डी, खो – खो खेळणे, कथा – कथन, वक्तृत्व स्पर्धा, स्काऊट गाईड व नाटकांत काम करण्याचा छंद होता. कॉलेज मध्ये व खेड्या पाड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिव जयंती, डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती, मोहरम व गणपती उत्सव साजरे करणे इत्यादी कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेत – घेत कॉलेज मध्ये असताना १९९२ साली जिल्हा परिषद निवडणूकीत उतरून राजकारणात प्रवेश केलेले आहेत. तर १९९५ साली तत्कालीन १७२ भोकर विधानसभा मतदारसंघातून प्रस्थापित उमेदवारांच्या विरोधात अपक्ष निवडणूक लढविलेल्या आहेत.

पंचायत समिती, जिल्हा परिषदा व विधानसभा इत्यादी निवडणुकीत पराभव झाला तरी गायकवाड यांनी हार न मानता लढा चालूच ठेवलेला आहे. भारतीय जनता पार्टीत १९९६ पासून सक्रिय असुन उमरी तालुका अध्यक्ष व नांदेड जिल्हा पातळीवर महत्त्वाच्या विविध पदावर कार्य केलेले असून सध्या भाजपा चे विद्यमान प्रदेश कार्यकारिणी निमंत्रीत सदस्य व कुदळा ग्रामपंचायत सदस्य या पदावर कार्यरत आहेत. गायकवाड यांच्या कार्याचा महाराष्ट्रात वरच्या वर आलेख उंचावतच आहे. हे पाहून विरोधक मागे पाय ओढण्याचा भरपूर प्रयत्न करीत असतात परंतु गायकवाड त्यांना भिक न घालता कार्य करीत आहेत. सत्ते करीता कधी लाचारी पत्काराले नाहीत. म्हणून सत्तेपासून आजतागायत दूरच आहेत. तरी यामध्ये समाधान मानून सतत कार्य करीतच आहे.

किशनराव गायकवाड यांनी अन्याय अत्याचाराच्या विरोधात लढुन जनसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी ऑक्टोबर २०२४ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था नाशिक येथे वृत्तपत्रविद्या पदविका अभ्यासक्रम कोर्स पूर्ण करून प्रथम श्रेणीत पास झालेले असून अन्याय, अत्याचाराच्या विरोधात लेखणीद्वारे आवाज उठविण्यासाठी दैनिक लोकनेता या लोकप्रिय दैनिकाचे उमरी तालुका प्रतिनिधी होऊन कार्य हाती घेतलेले असून भ्रष्टाचारी प्रशासकीय अधिकारी व प्रस्थापित सत्ताधारी लोकप्रतिनिधींच्या विरोधात निर्भिड पणे बातम्या प्रसिद्ध करून शेतकरी, शेतमजूर, घरकुल व इतर विविध योजनेच्या लाभधारकांच्या आर्थिक पिळवणूकीला आळा घालुन सर्व सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी पत्रकार या नात्याने सदैव भुमिका बजावत आहेत.

गायकवाड यांच्या कार्याची दखल घेऊन लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रीय अध्यक्ष भागवत वैद्य, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव मुंबई, प्रदेश अध्यक्ष प्रतापराव सोळुंके, मराठवाडा विभागीय सचिव बाजीराव गायकवाड पाटील यांनी किशनराव गायकवाड यांची लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्याच्या उमरी तालुका अध्यक्ष पदी निवड केलेली असून त्यांना ओळख पत्र सुद्धा बहाल करण्यात आले आहे. या जबाबदारी मुळे नागरीकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत राहील अशी प्रतिक्रिया गायकवाड यांनी दिली आहे. सदरील निवडी बद्दल मित्र मंडळी व कार्यकर्त्यां कडून गायकवाड यांना फोनद्वारे अभिनंदनाचा वर्षाव करीत आहेत.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई शाखा केज च्या वतीने तहसीलदार यांना निवेदन



केज । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे डिजिटल मीडिया प्रदेशाध्यक्ष तथा दैनिक जनप्रवास चे संपादक सिद्धार्थजी भोकरे साहेब यांना अज्ञात इसमाने निनावी पत्राद्वारे जीवे मारण्याची धमकी दिली होती. हा प्रकार दि.१५ मे २०२५ रोजी उघडकीस आला, जेव्हा सिद्धार्थजी भोकरे यांना भारतातील अभिनय क्षेत्रातील देश भक्तीवर परखड आणि जबाबदार वक्तव्य केले होते. सिद्धार्थजी भोकरे यांच्या या स्पष्ट मतावर आधारित एका अज्ञात इसमाने त्यांना धमकीचे पत्र पाठवले. या पत्रात भोकरे यांना धमकावले गेले की तुम्ही खान बंधू ची माफी मागितली नाही तर तुम्हाला उडवून टाकले जाईल.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केज यांच्या वतीने या घटनेचा तीव्र शब्दात जाहीर निषेध व्यक्त केला असून सिद्धार्थजी भोकरे यांना तातडीने सुरक्षा पुरविली जावी व जर आरोपीला तातडीने अटक केली नाही, तर केज शाखेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करणारे आंदोलन छेडले जाईल असा इशारा दिला आहे.अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर झालेला हा हल्ला असून आरोपी वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात येऊन योग्य ती कारवाई करण्यात यावी असे निवेदन श्री. संजयजी भोकरे व श्री.गोविंदजी वाकडे यांच्या आदेशानुसार तसेच श्री.वैभव स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली केज तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई केज तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड, सचिव विजय बिक्कड, कार्याध्यक्ष नंदुलाल मिसाळ, अध्यक्ष पत्रकार हल्लाविरोधी समिती विश्वास राऊत आदी उपस्थित होते.

# देवा तुला शोधू कुठे...?



माझा नाथ गेला अनाथाचा नाथ गेला
सर्वांना सोडूनी गेला अन माझा नाथ देव
झाला देवा तूला मी शोधू कुठे ?
माझ्या नाथाला नव्हते भेदभाव सर्वच
सारखे राव सारी जनते विषयी कळं
रात्रंदिवस जनतेसाठी पळं त्यांच्या
अंगात होते बळं मन त्याच होत निर्मळ.
आले होते सुवर्णकाळ अन माझा नाथ
देव झाला ।। १।।
सर्वाच्या हृदयात नाथ सर्वांच्या मुखात
नाथ फक्त एकच होते साहेब गोपीनाथ
नाथ तू गेला कुठे ? ।।२।।
गेले होते दुःखाचे दिसं आले होते
सुखाचे दिसं नाथ तू कुठ हरवला ?
तीन जूनला जगाचा तारा मावळला अन
नाथ देव झाला.... ।। ३ ।।
अनाथाचे स्वप्न स्वप्नच राहीले साऱ्या जनतेनी आश्रुंची धारा
वाहीले अन माझा नाथ देव झाला ।। ४ ।।
तूमच जीवन अपूर्ण राहीला सारा संसार नाही पाहीला नाही येणार
परत आवाज सकाळ अन सांझ मुखडा होता ता लाखमोलाचा
जीवन होते अनमोलाचे तूझ्याविणं जग परका झाला तुझ्या
जीवणाचा कसा अंत झाला ? अन माझा नाथ देव झाला ।। ५।।
नाथ नाथ म्हणता म्हणता कंठ माझा सुकला माझा नाथ कुठच
नाही भेटला अन माझा नाथ देव झाला ।। ६ ।।
हे नाथा परत ये जन्माला आशा लागली बीड जिल्हयाला कवी
विष्णुदास म्हणे, अनाथाना आश्रय दयावे लागले तूम्हाला....

विष्णू सखाराम राठोड
मो. ९९२२२६६७६३

# लोकनेत्याच्या अभिवादनासाठी गोपीनाथगडावर लोटला जनसागर!

## कुटुंबापेक्षाही काकणभर अधिक प्रेम जनतेने दिले; त्याची उतराई होण्याचा आयुष्यभर प्रयत्न करेन- ना. मुंडे

## गोपीनाथराव मुंडेंसारखे आता ऐसे कोणी पुढे होणे नाही-रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

माझे पिता आणि आपले नेता लोकनेते गोपीनाथराव मुंडे हे पुण्यात्मा होते. त्यांनी आयुष्यभर कोणाचेही वाईट चिंतले नाही. सदैव वंचितांचे वाली आणि वाणी होण्याचा त्यांनी मार्ग निवडला. त्यातूनच त्यांचे मोठेपण निर्माण झाले. आज त्यांच्या जाण्यानंतर अकरा वर्षांनीही हा विराट जनसमुदाय हेच दाखवून देतो. मुंडे साहेबांनंतर तुम्ही आम्हाला बळ दिलं. आमच्या परिवाराला शक्ती दिली. त्यामुळे कुटुंबापेक्षाही काकणभर अधिकचे प्रेम तेम्ही केलेलं आहे. त्या प्रेमातून उतराई होण्याचा आयुष्यभर प्रयत्न करेन अशी ग्वाही राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी गोपीनाथ गडावरील कार्यक्रमात दिली. तर गोपीनाथराव मुंडेंसारखे आता ऐसे कोणी पुढे होणे नाही असे वर्णन रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक यांनी कीर्तन प्रसंगी बोलताना केले.



लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या अकराव्या पुण्यतिथीनिमित्त गोपीनाथ गडावर आयोजित कार्यक्रमात बोलताना ना पंकजाताई मुंडे यांनी उपस्थितांशी आत्मीय संवाद साधला. या ठिकाणी उपस्थित प्रत्येक जण म्हणजे गोपीनाथ मुंडे परिवार असल्याचे आवर्जून सांगत हा आपल्या परिवाराचा कार्यक्रम असुन या ठिकाणी आपण दरवर्षी येऊन ऊर्जा घेतो. लाखोंचा जनसमुदाय मला सातत्याने शक्ती देतो. हे प्रेम, ही शक्ती यापुढेही अशीच माझ्या पाठीशी राहावी अशी अपेक्षा ना. पंकजाताई यांनी व्यक्त केली. गोपीनाथ गडावर लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त रामायणाचार्य ह भ प रामराव महाराज ढोक यांचे कीर्तन झाले. या कीर्तनानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

तत्पूर्वी सकाळपासूनच गोपीनाथगडावर स्व. मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून मुंडेप्रेमींनी रीघ लावली होती. त्याचबरोबर स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, वृक्ष रोपांचे वाटप, पशुसंवर्धन कॅम्प आदी उपक्रमही घेण्यात आले. या उपक्रमातही नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद घेतला. गोपीनाथ गडावर झालेल्या या कार्यक्रमाला व दर्शनाला राजकीय क्षेत्रातील नेतेमंडळी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कोणाची दृष्ट न लागो आपल्या या वैभवाला...

यावेळी काहीशी भावुक भावना व्यक्त करताना ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, आज अकरा वर्षे झाले माझे बाबा आणि आपले नेते आपल्यातून निघून गेलेले आहेत. त्यांचे संस्कार आणि विचार पुढे घेऊन जाणे हे आपले कर्तव्य आहे. त्या विचारावर वाटचाल करताना वंचितांचा वाली आणि वाणी होण्याचा आपण सातत्याने प्रयत्न केला आहे. आजच्या या क्षणी सर्व भावंडे सर्व परिवार गोपीनाथगडावर एकत्र आहे. याचा मुंडे साहेबांनाही मोठा आनंद निश्चितच होत असणार. वैभव म्हणजे गाडी, संपत्ती, पैसा हे नाही तर लाखोंचा जनसमुदाय व त्यांचे हे प्रेम हे खऱ्या अर्थाने आमच्या परिवाराचे वैभव आहे. कितीही यातना भोगण्याची वेळ आली तरी त्या जनतेच्या प्रेमासाठी आम्ही यातना भोगायला तयार आहोत. मात्र या वैभवाला कोणाची दृष्ट लागू नये असे वाटते असे पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगितले.

### आज मुंडे साहेब असते तर देशाच्या कारभारात मोठ्या पदावर असते

यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाचा संदर्भ देत ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, आज मुंडे साहेब असते तर निश्चितच ते देशाच्या केंद्रस्थानी कारभारात मोठ्या पदावर असते. केंद्रातील त्यांच्या सर्व सहकाऱ्यांसोबत सदैव ते आपल्याला दिसले असते. मात्र नियतीला हे मान्य नव्हते. त्यामुळे मुंडे साहेब आज आपल्यात नसले तरी त्यांचा वारसा, विचार आणि संस्कार आपल्या पाठीशी आहेत. त्या आशीर्वादावर निश्चितच मुंडे साहेबांना अभिप्रेत असा सामाजिक न्याय आपल्याला प्राप्त होईल असा विश्वास ना पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला.

### अकरा वर्षानंतरही ३ जून आली की वीज कोसळणाऱ्या त्या कटू आठवणी जाग्या होतात

यावेळी अकरा वर्षांपूर्वीच्या आपल्यावर कोसळलेल्या दु:खाच्या आठवणी आपल्याला आजही वीज कोसळल्याचाच अनुभव करून देतात असे सांगताना पंकजाताई मुंडे यांनी तो दु:खद प्रसंग सांगितला. अकरा वर्षांपूर्वी मुंडे साहेब आमच्यातून गेले तेव्हा खूप मोठं संकट खूप मोठी वीज आमच्या डोक्यावर कोसळली होती. दोन जूनला रात्री मुंडे साहेबांना मी शेवटचे बोलले तेव्हा ते मला सांगत होते की मला हेलिकॉप्टर पाहिजे कारण मला सत्काराला जायचंय. सत्काराला परळीला जायची सगळी तयारी झाली होती. अचानक सकाळी सहाच्या सुमारास फोन आला की बाबांचा एक्सीडेंट झाला आणि नियतीने आपलं सर्वस्वच हिरावून नेलं असा प्रसंग कोणावरच येउ नये असे ना. पंकजाताई यांनी सांगितले.

### स्व.आर.टी. देशमुखांच्या निधनाने पुन्हा तसाच दु:खद प्रसंग

गोपीनाथगडावरील कार्यक्रमातही स्व.आर.टी. देशमुखांच्या निधनाचे दु:ख व्यक्त करत पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, मुंडे साहेबांच्या आपघाताच्या कटू आठवणीसारखाच पुन्हा तसाच दु:खद प्रसंग स्व.आर.टी. देशमुखांच्या निधनाने आला. आर.टी. देशमुख जिजा यांचे निधन ही अतिशय दु:खद घटना झाली. आपण गोपीनाथ गडावर आवर्जून त्यांचा फोटो लावला. लेक म्हणून सूतकही पाळले. ना जात, ना पंथ ना धर्म परंतु असे असंख्य ऋणानुबंध मुंडे साहेबांनी निर्माण केलेले आहेत. मुंडे साहेबांचा हाच वारसा पुढे घेऊन जाण्याचा आपला प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

# स्व. मुंडे साहेबांमुळे आमच्या कुटुंबाला आमदारकी मिळाली : बाळराजे पवार

### गोपीनाथगडावर जाऊन बाळराजे पवारांनी लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडेंना केले अभिवादन

गेवराई । प्रतिनिधी

स्व. मुंडे साहेबांमुळे आमच्या कुटुंबाला आमदारकी मिळाली. त्यांनीच राजकारणात आणून, डोक्यावर हात ठेवला. आमच्या मध्ये एक वेगळ्या नात्याची वीण तयार झाली होती. ते ऋणानुबंध आज शब्दात सांगता येत नाहीत. अशी भावना व्यक्त करून, युवा नेते बाळराजे पवार यांनी लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त गेवराईचे गोपीनाथ गडावर जाऊन अभिवादन केले.



स्व.गोपीनाथरावजी मुंडेच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी, आपल्या भावना व्यक्त करतांना बाळराजे पवार यांनी लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणीना उजाळा देतांना ते म्हणाले की, २०१३ साली स्व.गोपीनाथ मुंडे यांनीच आमच्या कुटुंबाना गेवराईच्या राजकारणात सक्रिय केले. भारतीय जनता पक्षाकडुन माझे बंधू लक्ष्मण पवार यांना विधानसभेची उमेदवारी दिली. आशीर्वाद देऊन निवडून आणले. आमदार केले. आमच्या सारख्या राजकारणातून बाजुला गेलेल्या अनेक कुटुंबातील लोकांना स्व.गोपीनाथ मुंडेनी सत्तेत आणण्याचे काम केले आहे. आम्ही त्यांच्या विश्वासाला पात्र राहण्याचा इमानदारीने प्रयत्न केला आहे. असे सांगून, बाळराजे पवार म्हणाले, स्व.गोपीनाथ मुंडे ही व्यक्ती नसुन एक विचार आहे. तोच विचार पुढे घेऊन जाण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहुत, अशा भावना व्यक्त बाळराजे पवार यांनी स्व.गोपीनाथ मुंडेना अभिवादन केले आहे. यावेळेस संतोष हागे, प्रमोद मोटे, ईश्वर पवार, कृष्णा ढाकणे, लक्ष्मण मुंडे, प्रशांत राख, संतोष वनवे, विष्णुपंत आतकरे, बाळासाहेब उबाळे, श्रिराम घाटुळ, संतोष राठोड, प्रकाश गाडे आदि उपस्थित होते.

# उपसरपंच सोहेल पठाण यांनी घेतला सिरसाळा ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचा पदभार

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा सरपंच अन्वर पट्टेदार यांना सर्वोच न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निकाल कायम ठेवून अपात्र केल्याने उपसरपंच सोहेल पठाण यांनी आज दिनांक रोजी सरपंच पदाचा पदभार स्वीकारला आहे. सिरसाळा सरपंच अन्वर पट्टेदार यांना २१. वर्षापेक्षा कमी वय भरत असताना स्वतः ग्रामपंचायत निवडणूक लढविल्याने जिल्हा अधिकारी बीड यांनी सिरसाळा सरपंच अन्वर पटेदार यांना अपात्र केले होते. परंतु सरपंच यांनी आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे जिल्हा अधिकारी बीड यांच्या निर्णय विरोधात धाव घेतली परंतु आयुक्तांनी सुद्धा सुनावणी घेऊन जिल्हा अधिकारी बीड यांच्या अपात्र केलेला निर्णय कायम ठेवत सरपंच यांची याचिका फेटाळण्यात आली.

त्यानंतर सरपंच पट्टेदार यांनी हायकोर्टा औरंगाबाद यांच्याकडे जिल्हा अधिकारी बीड व आयुक्त औरंगाबाद यांच्या निर्णय विरोधात अपील याचिका दाखल केली आठ मे हायकोर्टात सुनावणी घेण्यात आली. त्यानंतर हायकोर्टाने सुद्धा जिल्हा अधिकारी बीड यांनी सिरसाळा सरपंच



अन्वर पटेल यांच्या सर्व कागदपत्रे तपासले असता या जन्म प्रमाणपत्रात वर जन्मतारीख १० फेब्रुवारी २००१ आहे. परंतु अनवरपट्टीदार यांच्या आई वडील यांच्या नावे भिन्न असल्याने व शाळेच्या रेकॉर्ड वर सुद्धा खडाखोड केलेली आहे. आणि हे सर्व ग्रामपंचायत निवडणूक लढवण्यासाठी बोगस कागदपत्रे तयार करून निवडणूक लढवली आहे.

दिनांक २७ मार्च २०२५ रोजी जिल्हा अधिकारी बीड यांचा निर्णय कायम ठेवत सरपंच अनवर पट्टेदार यांना अपात्र ठरविण्यात आले. आहे तरी सरपंच यांनी पुन्हा जिल्हाधिकारी बीड आयुक्त औरंगाबाद हायकोर्ट औरंगाबाद निर्णय विरोधात कपिल दाखल केली. परंतु सुप्रीम कोर्टाने देखील सुनावणी घेऊन अखेर २१.मे सिरसाळा सरपंच अन्वर पटेदार यांना अपात्र केले होते. त्यामुळे सिरसाळा ग्रामपंचायत ला सरपंच पद रिक्त असल्याने ग्रामपंचायत चा कामकाज चालवण्यासाठी १५. सदस्यांनी गट विकास अधिकारी यांच्याकडे उपसरपंच यांना सरपंच पदाचा पदभार देण्याची मागणी केली होती.

त्यानंतर २७ तारखेला सही नमुनेचा अजेंडा काढून आज दिनांक३० मे रोजी उपसरपंच यांना सरपंच पदाचा पदभार देण्यात आला आहे. यामुळे आत्ता गेल्या अडीच महिन्यापासून रखडलेला गावचा विकास प्रभारी सरपंच सोहेल पठाण यांच्या नेतृत्वाखाली व्यक्त होत आहे. तरी सिरसाळा वासियाना ह्या तरी सरपंचाच्या काळात विकास करण्याचे डोहाळे सामान्य नागरिकाला लागले आहे.

यावेळी उपसरपंचाने पदभार घेतल्यावर त्याचा त्याच गावातील नागरिकांनी त्याचा सत्कार करण्यात आला. या वेळी उपस्थित सिरसाळा गावचे विकास पुरुष मा.सरपंच राम दादा किरवले, ॲड. सतीश काळे, मा.सरपंच आक्रम खानसाब, वकील साहेब, सिरसाळा ग्रा.सदस्य रफिक शेट नदीम शेख ज्यानी ह्या कामासाठी अतोनात कष्ट घेतले आहेत. ते फिरोज पठाण यांनी उपसरपंचांने सरपंच पदचा पदभार घेतल्यानंतर त्याचा सत्कार करण्यात आला आहे.

# केज ग्रीन सिटीसाठी आज बैठकीचे आयोजन

केज । प्रतिनिधी

सध्या केज शहर दोन महामार्गाच्या जोडणी वर आहे. मात्र या महामार्गाच्या कडेने विस्तारित शहरांतर्गत भागात झाडे नाहीत. अगोदर असणारी थोडी फार झाडेही रस्ताच्या कामानिमित्त तोडण्यात आली आहेत. एकेकाळी केज शहरात वडाची विशाल झाडे अस्तित्वात होती. राज्यातील अनेक शहरांनी वृक्षारोपण करून झाडे वाढवली आहेत. त्यामुळे पर्यावरणपूरक वातावरण बनून लोकांना आनंद मिळत आहे.

केज शहरातील रस्त्यावर झाडे नाहीत. हिरवीगार झाडी शहराचे वैभव असते. त्यावरच शहराची प्रतिष्ठा व मूल्ये तयार होतात. पुढील पिढीसाठी ते एक भूषण असते. यासाठी कोणाला तरी योगदान द्यावे लागते. म्हणून 'केज ग्रीन सिटी' चळवळ राबवण्याचा आम्ही संकल्प केला आहे. यासाठी मदतीचे असंख्य हात हवे आहेत. केज शहर व तालुक्यातील पर्यावरण व वृक्ष प्रेमी युवक-युवती व नागरिकांना आम्ही या कार्यासाठी हाक देत आहोत. यासाठीची व्यापक बैठक बुधवार दि.४ जून २०२५ रोजी दुपारी ठीक ३ वाजता शासकीय विश्रामगृह केज येथे आयोजित केली आहे. तरी आपण याबैठकीला उपस्थित राहावे असे आवाहन केज ग्रीन सिटी ग्रुप (केजीसीजी) च्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९४२३७३३८८८ व ०७७०९४४२७३०, ९०११८०२९८२, ९४०४१००१९९ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# कडा येथे नागेश तात्या कर्डिले यांच्या वाढदिवसानिमित्त वैकुंठ रथाचे लोकार्पण

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा येथील शिवनेरी पतसंस्थेचे चेअरमन तथा कडा किराणा व्यापारी संघटनेचे अध्यक्ष मा.नागेश तात्या कर्डिले यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते आमदार सुरेश अण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली शिवनेरी पतसंस्थेच्या वतीने कडा शहरासाठी अत्यंत आवश्यक असलेला वैकुंठ रथाचे युवा नेते तथा जामगाव चे सरपंच शाम भैय्या धस व ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

कडा शहरातील एक अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे जर एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला आणि त्या मृत व्यक्तीच्या घरापासून स्मशानभूमीपर्यत जाण्याचा मार्ग लांब असला तर अंत्ययात्रा स्मशानभूमीपर्यत पहोचण्यात अनेक अडचणी येत होत्या. जसे की अंतर जास्त असणे, पाऊस चालू असणे





या अडचणी कडा येथील शिवनेरी पतसंस्थेचे चेअरमन नागेश तात्या कर्डिले यांच्या लक्षात आल्या. या अडचणी दुर करण्यासाठी त्यांनी शिवनेरी पतसंस्थेच्या माध्यमातून वैकुंठ रथ बनवला व वाढदिवसानिमित्त त्या वैकुंठ रथाचे लोकार्पण केले. या कार्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक करत नागेश तात्या कर्डिले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल, शाम भैय्या धस, संदिप खाकाळ, सुनिल सुर्यवंशी, रमजान तांबोळी, राजाबापु कर्डिले, संजय ढोबळे, गोरख कर्डिले, संपत सांगळे, उपसरपंच दिपक कर्डिले, सुरेश राठोड, नितीन शिंगवी, योगेश भंडारी, संजय मेहेर, सुनिल गाडे, राजू शिंदे, गणेश कटारिया, राम ससाणे, सुनिल देशमुख, डॉ.नितीन गोरे, केशव चव्हाण, अशोक कर्डिले, युवराज चव्हाण, विठ्ठल मिसाळ, बाळासाहेब पवळ, रहेमान सय्यद, एसबीआय कडा व्यवस्थापक नवनाथ शेळके, वैद्यनाथ बैकेचे सतिष नगरकर पतसंस्थेचे संचालक आप्पासाहेब सांगळे, संदिप कर्डिले, कुंडलिक कर्डिले, संजय कर्डिले, प्रा.कैलास वायभासे, गोकुळ कर्डिले, आयुब मोमीन, श्रीकृष्ण पाटील, महादेव कोकरे, दत्तात्रय सोनवणे सह कडा शहरातील सर्व किराणा व्यापारी, शिवनेरी पतसंस्थेचे मुख्य व्यवस्थापक प्रशांत गिलचे, अमोल कर्डिले, कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# आ. प्रकाश दादा सोळंके रोड बनवा राजकारण करू नका

### माजलगाव मतदार संघाच्या जनतेने तुम्हाला निवडून दिले जनतेचा विश्वासघात करू नका रस्ता रोको आंदोलनात हजारो चे संख्या ने उपस्थित रहा : नवीदोद्दीन सिद्दिकी

माजलगाव । प्रतिनिधी



माजलगाव तालुक्यातील माजलगाव तेलगाव रस्ता हा मृत्यू सापळा बनला आहे अनेक वर्षांपासून हा रस्ता खराब झाला असल्याने या रोडवर आणि खड्डे आणि रस्त्याला बळी पडलेल्या आहेत त्यामुळे दोन-तीन वर्षांमध्ये या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून या अपघातामध्ये शेकडो प्रवाशांचे बळी गेले तर अनेक जणांची घरे उध्वस्त झाली कारण हा रस्ता मृत्यूचा चा सापळा बनला आहे असे म्हणायला वांगी ठरणार नाही.

अनेक वेळी वेगळे वेगळ्या पक्ष संघटनांनी अनेक तक्रार अर्ज, निवेदने देऊन लोकशाही मार्गाने मोर्चे, आंदोलने व विविध कार्यालय समोर उपोषण केली परंतु हा रस्ता बनवण्यासाठी महाराष्ट्र व जिल्हा शासन प्रशासनाला जाग आली नाही व माजलगाव चे सत्ताधारी आ. प्रकाश सोळंके हे ३०-३५ वर्षापासून माजलगावचे आमदार असून यांचे या रस्त्याच्या बाबतीत दुर्लक्ष होत असल्याने अनेक जणांना आपले प्राण गमवावे लागत आहेत. अनेक वेळा सर्व सामान्य जनतेने आ. प्रकाश सोळंके यांना सांगूनही हा रस्ता करण्यासाठी त्यांनी हा रस्ता बनवण्याचा प्रश्न वारंवार टाळला आहे म्हणून माजलगाव मतदार संघातील नागरिकांमध्ये व कार्यकर्त्यांमध्ये सत्ताधारी आ. प्रकाश सोळंके यांच्या व शासन प्रशासनाच्या व सिस्टमच्या विरोधात आक्रोशाचा वातावरण निर्माण झाले असून त्या अनुषंगाने दि. ५/६/२०२५ रोजी परभणी फाटा चौक येथे सर्व पक्षीय रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे, तरी नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन माजलगाव समाजवादी पार्टी तालुका अध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# समुपदेशनाने बदल्या; ना. पंकजा मुंडेंचे पशूसंवर्धन अधिकाऱ्यांनी मानले आभार



परळी वैजनाथ । प्रतिनिधी

पशूसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया पहिल्यांदाच समुपदेशनाने झाली, या निर्णयाने आनंदित झालेल्या अधिकाऱ्यांनी काल गोपीनाथ गडावरील कार्यक्रमात राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांना आभारपत्र देऊन त्यांचे ऋण व्यक्त केले.

ना. पंकजाताई मुंडे यांनी पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या नुकत्याच समुपदेशनाने बदल्या केल्या होत्या, या निर्णयामुळे प्रत्येकाला हवी ती पोस्टींग मिळाली. आनंदित झालेले सर्व अधिकारी कार्यशाळेच्या निमित्ताने परळीत एकत्र आले होते, या सर्वांनी गोपीनाथ गडावरील कार्यक्रमास उपस्थित राहून ना. पंकजाताई मुंडे यांची भेट घेतली व त्यांचे ऋण व्यक्त केले.

यावेळी पुणे अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ शीतल मुकणे, संचालक डॉ. भिकाने, डॉ. राजेश्वर कदम, डॉ. विजयकुमार देशमुख, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद बीड, डॉ. मोरे, डॉ .रमण देशपांडे, डॉ. आघाव, छत्रपती संभाजी नगर विभागातून आलेले अनेक पशुवैद्यकीय डॉक्टर तसेच महाराष्ट्र पशुवैद्यक राजपत्रित संघटनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

**मुक्या जीवाच्या विभागाला ना. पंकजाताईंमुळे आवाज व पालकत्व**

अधिकाऱ्यांनी ना. पंकजाताई मुंडेंना दिलेल्या आभारपत्रात म्हटले आहे की,महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन विभागाची स्थापना २० मे १८९२ मध्ये झाली. तदनंतर प्रस्तुत विभागाचे काळानुरूप स्वरूप बदलत गेले. मुक्या जीवांची सेवा करणारा विभाग वर्षानुवर्षे तुलनेने दुर्लक्षित राहिला या विभागाला आवाज व पालकत्व आपल्या रूपाने प्राप्त झाले. बदलत्या काळानुसार पशुसेवा, पशुआरोग्य, पशुजन्य उत्पादने व पशुसंवर्धनाचे मानवी आरोग्यातील महत्त्व या बाबी आपल्या दूरदर्शी व उच्चशिक्षित नेतृत्वाने तात्काळ हेरल्या व त्यानुसार या विभागासाठी आवश्यक असणारे मूलभूत पशुधन विकास अधिकारी व इतर सर्व पदे आपण विभागाच्या पुनर्रचनेमध्ये समाविष्ट केले. आपल्या या निर्णयाने महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या इतिहासात निश्चितच सोनेरी काळाचा उदय होणार आहे.

# शंकर देशमुख यांची भाजप जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती योग्य नेतृत्वाला दिलेला न्याय : नागरगोजे यांचे मत

बीड । प्रतिनिधी



शंकर देशमुख यांची भारतीय जनता पक्षाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करून पक्षश्रेष्ठींनी योग्य नेतृत्त्वाला न्याय दिला असल्याचे मत भाजपा सोशल मीडिया जिल्हा सहसंयोजक महादेव नागरगोजे यांनी व्यक्त केले आहे. देशमुख यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात भाजपाचे संघटन अधिक मजबूत होईल आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांम ध्ये पक्षाला चांगले यश मिळेल, असा विश्वास नागरगोजे यांनी आपल्या पत्रकात व्यक्त केला. ते म्हणाले की, भाजप हा असा पक्ष आहे जिथे प्रामाणिक कार्यकर्त्यांना कामाच्या जोरावर संधी मिळते. पक्षश्रेष्ठींनी गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारांशी निष्ठा असलेल्या कार्यकर्त्यांवर विश्वास दाखवून योग्य नेतृत्वाला जबाबदारी दिली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT